जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१६/३५२०
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक:- १६/०५/२०१६

प्रति,

संस्थाचालक,
सर्व शासनमान्य टंकलेखन/लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य व गोवा.

**विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जून-२०१६**
**प्रिलिस्ट मध्ये ऑनलाईन दुरुस्ती करणेबाबत .....**

शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जून-२०१६ ची प्रिलिस्ट परिषदेच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यात आलेली आहे. सदरच्या प्रिलिस्टमध्ये काही दुरुस्ती असल्यास त्या दुरुस्त्या दि. **२३ मे २०१६ रोजी अखेर** परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन कराव्यात. त्याकरिता खालील सूचना देण्यात येत आहेत.

१. प्रिलिस्ट मधील विद्यार्थ्यांच्या नावातील स्पेलिंग मिस्टेक, विषय बदल, बॅच बदल या दुरुस्त्या करता येतील.
२. प्रिलिस्ट मध्ये विद्यार्थ्यांच्या पुर्व-अट बाबतची माहिती भरता येईल.
३. प्रिलिस्ट मध्ये विद्यार्थ्याचा फोटो चुकीचा आहे की बरोबर आहे ते नमुद करावे.
४. फोटो दुरुस्तीबाबत :-
प्रिलिस्टमध्ये फोटो दुरुस्ती विकल्प देण्यात आला आहे. त्यानुसार फोटो दुरुस्ती करुन घेण्यात यावी.
५. दि. २३ मे २०१६ रोजी रात्री ११.५९ नंतर प्रिलिस्टमध्ये ऑनलाईन दुरुस्ती करता येणार नाही. दुरुस्तीबाबतची वेबलिंक या दिवशी ठीक ११.५९ वाजता बंद करण्यात येईल.
६. त्यामुळे परीक्षार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्यास आपण संस्थाचालक म्हणुन सर्वस्वी जबाबदार रहाल. याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

**टिप :- १) प्रिलिस्टमध्ये परीक्षार्थ्यांच्या नावात पुर्णपणे बदल करु नये. तसे केल्यास संबंधित बदल केलेल्या परीक्षार्थ्यांचे आवेदनपत्र रद्द करण्यात येईल, त्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही. तसेच संबंधित संस्थेवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.**

**२) दुरुस्त्या केवळ ऑनलाईन पध्दतीने प्रिलिस्टमध्येच करता येतील, प्रिलिस्ट नंतर अथवा परीक्षोत्तर टप्प्यावर कोणतीही दुरुस्ती केली जाणार नाही. याबाबत परिषदेकडे कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करु नये, याचीही संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.**

(बी.डी.फडतरे)
प्र.आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -१

E:\s\New letter\ALL GCC EXAM FILES\2016\prilist.docx